REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# " जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये सुशोभीकरणात येणाऱ्या अडचणींचा" चिकित्सक अभ्यास

श्री. ओमप्रकाश रतन थेटे (स. शि.)
संशोधक एम.ए , एम.एड , नेट , सेट (शिक्षणशास्त्र) जि. प. प्राथ. शाळा पिंपळगाव
प्र.दे. तालुका : - चाळीसगाव जिल्हा :- जळगाव.
डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे
मार्गदर्शक

## प्रस्तावना :



विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व आणि सर्वांगीण विकास घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख उदिष्टे आहे.शिक्षण हे औपचारिक व अनौपचारिक माध्यमातून विद्यार्थी घेत असतो . औपचारिक शिक्षण हे शाळेत दिले जाते व अनौपचारिक शिक्षण हे परिसर व समाज यातून मिळते . पूर्वी शिक्षणासाठी गुरुकुल पद्धती होती .त्या वेळी गुरुची पर्णकुटी व आसपासचा परिसर म्हणजेच शालेय वास्तू होती. निसर्गाच्या सान्निध्यात शांत व प्रसन्न वातावरणात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया चालत असे . आधुनिक युगात शिक्षण प्रक्रियेत अनेक बदल झालेले आहेत. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत शालेय वास्तू ला महत्व आहे. शालेय वस्तू वरच मुलांचे संस्कार अवलंबून आहेत.

शाळेची इमारत जिथे उभी आहे किंवा शाळा भरते ती जागा व भोवतालची जागा म्हणजे शालेय परिसर होत. सुसंस्कृत देशात पेयाइतकेच पत्राला महत्व असते. फुलदाणी व फुले यांची शोभा हि परस्परांना पूरक असणाऱ्या रचनेमुळे वाढते. काही शाळांना निसर्गाची चांगली साथ लाभलेली असते तर काही शाळांच्या परिसरात घाण करणे, पत्ते खेळणे, गुरे बांधणे, परिसरातील झाडे उपटणे, शाळेच्या भिंतींवर लिहणे , क्रिडांगणावर खड्डे करणे, शालेय परिसरात थुंकणे, शालेय शुशोभीकरणात भाग न घेणे इत्यादी समस्या ग्रामीण भागात भेडसावतात. या समस्यांमुळे शालेय वातावरण व अध्ययन-अध्यापनावर परिणाम दिसून येतो. त्यामुळे संशोधकाने या समस्यांवर उपाय सुचविण्या साठी चिकित्सक अभ्यास केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

1. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुशोभीकरणात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे .
2. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुशोभीकरणात येणाऱ्या अडचणींच्या कारणांचा शोध घेणे .
3. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर सुशोभीकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे .

## संशोधन पद्धती :

कोणत्याही प्रकारचे संशोधन तयार करण्यासाठी संशोधनाच्या तीन पद्धती वापरल्या जातात. यामध्ये भूतकाळाचा अभ्यास करण्यासाठी **ऐतिहासिक संशोधन**पद्धतीचा वापर केला जातो.सद्यस्थिती किंवा वर्तमानकालीन परिस्थितीची माहिती गोळा करण्यासाठी **सर्वेक्षण संशोधन** पद्धतीचा वापर केला जातो. भविष्यकाळ संबंधित घटनेचा अभ्यास करण्यासाठी **प्रायोगिक**पद्धतीचा वापर केला जातो. संशोधकाने प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

### संशोधनाचे साधने व तंत्रे :

प्रस्तूत संशोधनात प्रश्नावली व निरीक्षण या साधनाचा वापर केलेला आहे. तसेच मिळविलेल्या माहिती वर प्रक्रिया करून त्या माहिती पासून काही निष्कर्ष काढण्यासाठी कोष्टकीकरण, सरासरी व शेकडेवारी या सांख्यकीय तंत्राचा वापर संशोधकाने केला आहे.

### नमुना निवड :

संशोधन करत असतांना पूर्ण जनसंख्येचा अभ्यास करणे खर्चिक व वेळ खाऊ आहे. त्यामुळे संशोधकाने संशोधनासाठी चाळीसगाव तालुक्यातील एकूण शाळांपैकी 5%शाळा संशोधनासाठी निवडल्या आहे.

### संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन :

सदर संशोधनासाठी संशोधकाने प्र श्नावली व पडताळा सूचीचा वापर करून जी माहिती मिळवली तिचे विश्लेषण करण्यासाठी कोष्टके तयार केली .तसेच सरासरी व शेकडेवारी या तंत्राचा वापर केला आहे.

### 1.शालेय परिसरात कचरा व घाण टाकणे

| अ.क्र. | एकूण प्रतिसादक | शालेय परिसरात कचरा व घाण टाकणारे विद्यार्थी | शालेय परिसरात कचरा व घाण नटाकणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 890 | 534 | 356 |
| 2. | सरासरी | 60% | 40% |

सारणी क्र. 1 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळांमधील एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी शालेय परिसरात कचरा व घाण टाकणारे 60% विद्यार्थी आहे. तसेच कचरा व घाण न टाकणारे 40% विद्यार्थी आहेत असे निरीक्षण व पडताळा सूची द्वारे समजले.

### 2. शालेय परिसरातील झाडे उपटणे

| अ.क्र. | एकूण प्रतिसादक | शालेय परिसरातील झाडे उपटणारे विद्यार्थी | शालेय परिसरातील झाडे न उपटणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 890 | 823 | 067 |
| 2. | सरासरी | 92.5% | 7.5% |

सारणी क्र. 2 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळांमधील एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी शालेय परिसरातील झाडे उपटणारे विद्यार्थी 92.5% आहे. तसेच शालेय परिसरातील झाडे न उपटणारे विद्यार्थी 7.5% आहेत असे निरीक्षण व पडताळा सूची द्वारे समजले.

### 3. शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब करणे

| अ.क्र. | एकूण प्रतिसादक | शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब करणारे विद्यार्थी | शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब न करणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 890 | 560 | 330 |
| 2. | सरासरी | 62.92% | 37.08% |

सारणी क्र. 3 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळांमधील एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब करणारे विद्यार्थी 62.92% आहे . तसेच शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब न करणारे विद्यार्थी37.08% आहेत असे निरीक्षण व पडताळा सूची द्वारे समजले.

### 4 .शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे करणे

| अ.क्र. | एकूण प्रतिसादक | शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे करणारे विद्यार्थी | शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे न करणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 890 | 625 | 265 |
| 2. | सरासरी | 70.22% | 29.78% |

सारणी क्र. 4 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळांमधील एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे करणारे विद्यार्थी 70.22% आहे . तसेच शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे न करणारे विद्यार्थी 29.78% आहेत असे निरीक्षण व पडताळा सूची द्वारे समजले.

### 5. शालेय परिसर सुशोभीकरणात भाग घेत नाही

| अ.क्र. | एकूण प्रतिसादक | शालेय परिसरसुशोभीकरणात भाग घेणारे विद्यार्थी | शालेय परिसरसुशोभीकरणात भाग न घेणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 890 | 620 | 270 |
| 2. | सरासरी | 69.66% | 30.34% |

सारणी क्र. 5 मध्ये चाळीसगाव तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळांमधील एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी शालेय सुशोभीकरणात भाग घेणारे विद्यार्थी 69.66% आहे . तसेच शालेय सुशोभीकरणात भाग न घेणारे विद्यार्थी 30.34% आहेत असे निरीक्षण व पडताळा सूची द्वारे समजले.

### निष्कर्ष :

1. शालेय परिसरात कचरा व घाण टाकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे.
2. शालेय परिसरातील झाडे उपटणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूपच जास्त आहे.
3. शाळेच्या भिंतींवर लिहिणे, भिंती खराब करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे.
4. शाळेच्या क्रिडांगणावर खड्डे करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे.
5. शालेय परिसरसुशोभीकरणात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण चांगले आहे.

### शिफारशी :

1. शाळांनी स्वच्छता साप्ताह साजरे करावेत.
2. विद्यार्थ्यांसाठी श्रमदान शिबिरे आयोजित करावीत.
3. भित्तिपत्रकांचे साप्ताहिक, पाक्षिक अंक तयार करून लावावेत.
4. शालेय वर्ग सजावटीच्या स्पर्धा घ्यावा.
5. शालेय परिसर विकास व सुशोभनासाठी विध्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा.
6. कार्यानुभव व समाजसेवा या विषयांचे ज्यादा तास घ्यावे .

### संदर्भ सूची :

1. मराठे, एम. जी.,पर्यावरण शिक्षण शिक्षक हस्तपुस्तिका, पुणे, प्रथमावृत्ती 2005
2. इनामदार , सु., अध्यापन आशय व पद्धती, पुणे, प्रथमावृत्ती 2001
3. महाजन, अ. वि., प्राथमिक स्तरावरील कृती संशोधन हस्तपुस्तिका, पुणे, प्रथमावृत्ती 2008
4. माळी, म. आ., शालेय स्वछता व आरोग्य शिक्षण, मुंबई, प्रथमावृत्ती 2005

5. हाबडे, सं. वि., जीवन शिक्षण लेख क्र.14, पुणे, सातवी आवृत्ती2006
6. बांबुळकर, सं. कृ., स्वच्छ सुंदर बोलकी शाळा, पुणे, प्रथमावृत्ती 2001
7. कांबळे, ब. अं., आमच्या शाळेतील नवोपक्रम, मुंबई, प्रथमावृत्ती 2004
8. करंडे, ह. कृ., शाळेची रचना व भौतिक सुविधा, नाशिक, सातवी आवृत्ती2007



**श्री. ओमप्रकाश रतन थेटे (स. शि.)**
**संशोधक एम.ए , एम.एड , नेट , सेट (शिक्षणशास्त्र)जि. प. प्राथ. शाळा पिंपळगाव**
**प्र.दे. तालुका : - चाळीसगाव जिल्हा :- जळगाव.**